डिसेंबर ८, २००३

**परदेशातील भारतीय विद्यार्थ्यांच्या निवासी स्थिती मध्ये बदल**

भारतीय रिझर्व्ह बँकेला परदेशांमध्ये शिकत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांकडून विनंत्या येत आहेत, की 'फेमा' अंतर्गत, त्यांना अनिवासींचा दर्जा दिला जावा. त्यांचे प्रतिपादन असे आहे की जरी ते विद्यार्थी असले, तरी त्यांच्या खर्चामधील मोठ्या भागासाठी ते भारतातील त्यांच्या घरुन येत असलेल्या रकमांवर अवलंबून नाहीत. अनेक वेळा त्यांना काम करण्याची परवानगी दिलेली असते आणि त्यासाठी त्यांना विशिष्ट संबंधित आर्थिक व्यवहार करावे लागतात. त्यामुळे त्यांच्या स्थितीमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांने प्रतिपादन आहे.

'फेमा' अन्वये, 'निवासी' च्या व्याख्येचा विचार करता, तसेच विद्यार्थी कायमचे स्थलांतर करण्यासाठी परदेशी जात नसूनही अनिश्चित काळासाठी परदेशांमधे राहण्याचा त्यांचा उद्देश असतो, या गोष्टीचा विचार करता, त्यांना 'फेमा' च्या द्दष्टिकोनामधून यापुढे अनिवासीचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. अनिवासी म्हणूनही; विद्यार्थी खालील प्रमाणे भारतामधून निधी मिळण्यास पात्र आहेतः

(१) भारतातील त्यांच्या निकटच्या नातेवाईकांच्या कडून जास्तीत जास्त १,००,००० अमेरिकन डॉलर पर्यंत, मात्र ही रक्कम देखभाल खर्चासाठी असेल असे स्वतः जाहीर करावे लागेल, तसेच यात त्यांच्या अभ्यासासाठीचा रकमांचाही सहभाग असू शकतो,

(२) भारतातील 'एडी' कडे असणाऱ्या त्याच्या खात्यावरील शिल्लक / विक्रीमधून येणाऱ्या रकमेमधून जास्तीत जास्त एक दशकक्ष अमेरिकन डॉलरपर्यंत,

(३) 'फेमा' अंतर्गत अनिवासी भारतीयांना उपलब्ध असलेल्या सर्व इतर सुविधा,

(४) विद्यार्थांनी (भारतात निवासी म्हणून) घेतलेली सर्व शैक्षणिक व इतर कर्जे पुढे सुरु ठेवण्यास परवानगी राहील.

तसेच स्पष्ट करण्यात येत आहे, की या सूचनांमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रयत्नां संबंधाने सध्या अस्तित्वात असलेल्या परकीय चलनविषयक सुविधांचा उपयोग कोणत्याही प्रकारे कमी होणार नाही.

**अजित प्रसाद**
प्रबंधक

**प्रेस रिलीज : २००३-२००४/७१०**